रयत शिक्षण संस्थेचे,

**आबासाहेब मराठे आर्ट्स & न्यू कॉमर्स, सायन्स कॉलेज, राजापूर (विखारे गोठणे)**

**सत्र ५ आणि ६ च्या गुणपत्रिकेबाबत सूचना**

दि. २०/०४/२०२६

महाविद्यालयातील बी. ए. / बी. कॉम. (रेग्युलर) / बी. कॉम. (अकौंटिंग & फायनान्स)/ बी. एस्सी. –तृतीय वर्ष आणि एम. कॉम. द्वितीय वर्ष या वर्गातील सर्व आजी माजी विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, काही विद्यार्थ्यांच्या तृतीय वर्ष सत्र ५ आणि ६ च्या गुणपत्रिका मुंबई विद्यापीठाकडून /महाविद्यालयाकडून प्राप्त होत नसल्याबाबत तक्रारी येत आहेत. याबाबत गुणपत्रिका न मिळण्याची कारणे व त्याच्या पूर्ततेसाठी करावयाच्या प्रक्रियेची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**गुणपत्रिका न मिळण्याची कारणे**

१. सत्र ५ व ६ चा निकाल राखीव असणे.

२. दहावी, बारावीचे गुणपत्रक, बारावी शाळा सोडल्याचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती प्रवेशावेळी न देणे.

३. ABC ID महाविद्यालयाला न देणे.

४. सत्र १, २, ३, ४ मध्ये ATKT असणे.

५. निकाल राखीव असूनही कार्यालयास स्वतः भेटून कागदपत्राची पूर्तता न करणे. याबाबत फोनवरील संपर्क ग्राह्य धरला जाणार नाही.

**गुणपत्रिका प्राप्त करण्यासाठी प्रक्रिया**

१. सत्र ५ चा निकाल राखीव असेल तर निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मा. प्राचार्य यांच्या नावे अर्ज लिहून त्यासोबत सत्र ५ च्या लेजरची प्रिंट आणि सत्र १ ते ४ च्या गुणपत्रिकेच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती, दहावी, बारावीचे गुणपत्रक, बारावी शाळा सोडल्याचा दाखला यांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती, ABC ID चा स्क्रीनशॉट स्वसाक्षांकित छायांकित प्रत जोडून द्यावा. तसेच महाविद्यालयाचे सर्व शुल्क भरल्याच्या पावत्याच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात. सर्व शुल्क भरणे आवश्यक आहे. त्याची लेखी पोच घ्यावी.

२. सत्र ६ चा निकाल राखीव असेल तर निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मा. प्राचार्य यांच्या नावे अर्ज लिहून त्यासोबत सत्र ६ च्या लेजरची प्रिंट आणि सत्र १ ते ५ च्या गुणपत्रिकेच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती, दहावी, बारावीचे गुणपत्रक, बारावी शाळा सोडल्याचा दाखला यांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती, ABC ID चा स्क्रीनशॉट स्वसाक्षांकित छायांकित प्रत जोडून द्यावा. तसेच महाविद्यालयाचे सर्व शुल्क भरल्याच्या पावत्याच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात. सर्व शुल्क भरणे आवश्यक आहे. त्याची लेखी पोच घ्यावी. (सत्र ५ ची गुणपत्रिका असणे आवश्यक आहे.)

३. विद्यार्थ्याने स्वतः उपस्थित राहून अर्ज द्यावा.

४. विहित मुदतीत अर्ज न केल्यास होणाऱ्या विलंबास संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील.

५. विलंबामुळे अथवा इतर कारणाने विद्यापीठाने दंड आकारल्यास संबंधित रक्कम विद्यार्थ्याने विहित मुदतीत भरावे.

६. Whatsapp अथवा email वर पाठवलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यातील गुणपत्रिकेचे फोटो अस्पष्ट असतात.

७. विद्यार्थ्याने महाविद्यालयात अर्ज दिल्यानंतर विद्यापीठाशी पत्रव्यवहार करून संबंधित सेमिस्टरचे गुणपत्रक विद्यापीठाकडून प्राप्त होईपर्यंत कमीत कमी ०३ ते ०४ महिन्याचा कालावधी लागू शकतो. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन तातडीने अर्ज करावा. त्यामुळे प्रवेश व नोकरीबाबत अर्ज करण्यासाठी अडचण येणार नाही.

दीपक

आबासाहेब मराठे आर्ट्स & न्यू कॉमर्स सायन्स कॉलेज ता. राजापूर, जि. रत्नागिरी

प्राचार्य

प्राचार्य
आबासाहेब मराठे आर्टस अॅन्ड
न्यू कॉमर्स सायन्स कॉलेज राजापूर
( विखारे गोठणे ) जि. रत्नागिरी

रु.५/-

## सत्र ५/६ च्या गुणपत्रिकेबाबत करायचा अर्ज

दि. ...../...... / २०.....

प्रति.
मा. प्राचार्य,
आबासाहेब मराठे आर्ट्स & न्यू कॉमर्स, सायन्स कॉलेज, राजापूर (वि. गोठणे)

विषय: सत्र ५/६ ची विद्यापीठ गुणपत्रिका मिळणे बाबत ....

महोदय

वरील विषयी विनंती अर्ज करतो/करते की, माझी माहिती खालीलप्रमाणे असून आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडली आहेत. तरी सत्र ५/६ ची मुंबई विद्यापीठ गुणपत्रिका आपल्या मार्फत मिळावी, ही नम्र विनंती.

१. संपूर्ण नाव:

२. वर्ग :

३. प्रवेशित वर्ष : प्रथम वर्ष ................ द्वितीय वर्ष ..................... तृतीय वर्ष .................

४. पत्ता:

५. मोबाइल क्रमांक :

६. इमेल :

वरील माहिती बरोबर असून मी तीनही वर्षाची सर्व प्रकारची महाविद्यालयाची संपूर्ण फी भरलेली आहे. त्याच्या पावत्याच्या झेरॉक्स सोबत जोडल्या आहेत. सोबत खालील कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती स्वसाक्षांकित करून जोडल्या आहेत.

१. दहावी, बारावी गुणपत्रक — २. बारावी शाळा सोडल्याचा दाखला
३. सत्र १ गुणपत्रक — ४. सत्र २ गुणपत्रक
५. सत्र ३ गुणपत्रक — ६. सत्र ४ गुणपत्रक
७. सत्र ५ गुणपत्रक/लेजर — ८. सत्र ६ लेजर
९. महाविद्यालय शुल्क भरल्याची पावती — १०. परीक्षा शुल्क भरल्याची पावती
११. ABC ID चा स्क्रीनशॉट — १२. ओळखपत्र

तसेच खालील विभागाच्या नादेय असल्याबाबत सह्या घेतल्या आहेत.

१. विभागप्रमख ................... २. ग्रंथालय .............
३. कार्यालय .......................

सदर अर्ज केल्यानंतर प्रक्रियेसाठी मुंबई विद्यापीठ कडून ०३ ते ०४ महिने लागणाऱ्या कालावधीची मला कल्पना आहे. तरी माझा अर्ज मा. प्राचार्य यांच्या मार्फत संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांना पाठवावा, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

सही ..........................................

(नाव: ....................................................................)